# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २५४** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४६ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४६ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.०८/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी - ११.०० वाजता झालेली स्थायी समिती सभा क्र.४६ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ४७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र.:- २५५** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./अति.नि.वि./०५/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.०८/०४/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** सेवा शुल्क रक्कम स्विकारणे, करारनामा करणे तसेच कार्यादेश देणे बाबत.

वाचा क्र.१ व अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अतिक्रमण निर्मुलन विभागास आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवठयाकामी आयुक्त यांनी दि.०७/०२/२०२५ रोजी मान्यता दिली असता त्या अनुषंगाने दि.१४/०२/२०२५ रोजी ई निविदा प्रसिध्द केली असता मुदतीत चार निविदा धारकांनी वेळेत ई निविदा भरली. उपायुक्त यांचे मान्यतेने लिफाफा क्र.१ (तांत्रिक कागद) उघडण्यांत आला त्यात तिन निविदा धारकांचे कागदपत्रांची अपुर्णता पाहता कमी असलेले कागदपत्रे सादर करणेसाठी शॉट फॉल दिला असता तिन पैकी एक निविदा धारकाने मुदतीत कागदपत्रांची पुर्तता केली नाही. उर्वरीत निविदा धारकांनी कागदपत्रांची पुर्तता केल्याने

१. ओम साई असोसिएट,पुणे
२. रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव
३. सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर

हे तिन निविदा धारक हयांनी कागदपत्रांची पुर्तता व छाननी अंती त्यांना पात्र करण्यात आले असून प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | प्राप्त दर (प्रति कामगार सेवा शुल्क) |
|---|---|---|
| १ | ओम साई असोसिएट,पुणे | १.००० L - २ |
| २ | रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव | १.००० L - २ |
| ३ | सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर | ०.००१ L - १ |

उपरोक्त दर प्राप्त झाले असता निविदा समिती सदस्य यांनी निविदा अटी शर्तीचे वाचन केले असता L - १ आलेले निविदाधारक सान्वी मल्टी सर्व्हीसेस,लातुर यांनी निविदेतील लिफाफा क्र.२ (आर्थिक लिफाफा) यामध्ये नमुद टीप - “केवळ प्रति दिन प्रति कामगार सेवा शुल्क रक्कम नमुद करावी सदर रक्कम ही पुर्णांकात असावी.” यानुसार दर भरले नसल्याने त्यांचे दर अपात्र करण्यांत आलेले आहे.

उर्वरीत १- ओम साई असोसिएट,पुणे, २- रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव हे L - २ असल्याने त्यांनी दिलेले दर हे समान असल्याने निविदा समितीच्या मान्यतने दि.२७/०३/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता उपायुक्त, महसुल यांचे कार्यालयात वाटाघाटी व योग्य निर्णयासाठी बोलविण्यात आले असता सदर मिटींग मध्ये उपरोक्त दोन्ही निविदा धारकांचे प्रतिनिधी तसेच निविदा निवड समिती सदस्य यांच्या चर्चेअंती साक्षीदार यांचे उपस्थितीत ईश्वर चिठ्ठी काढण्यांत आली त्यात निविदाधारक रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांची चिठ्ठी निघाल्याने त्यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांत आले.

सबब रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सर्व्हीसेस,जळगांव यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/- (एक रुपया) स्विकारण्यांस तसेच त्यांचेकडुन करारनामा करण्यांस, तसेच त्यांना सन-२०२५-२६ करीता ३५ मजुर पुरविण्यांसाठी कार्यादेश देणेस मान्यता मिळण्यासाठी अतिक्रमण अधिक्षक, अतिक्रमण निर्मुलन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ४७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र.:- २५६** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१६/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२८/०४/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) चे वार्षीक दर मंजुर करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेच्या उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणे कामी आयुक्त यांच्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.४५/२०२४-२५ (Tender ID २०२५-JCMCJ-११४७३४१-१) http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन सदर ई-निविदेमध्ये ०३ ई निविदा प्राप्त झाले असुन आयुक्त यांच्या मान्यतेने पात्र झालेले ०३ निविदाधारकांचा दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| निविदाधारकाचे नांव | Vikram Chemicals, Sinner, Nashik | Thakkar Inorganics Pvt.Ltd.Mumbai | Swanand Traders Pvt Ltd, Loni Khurd, Tal Rahata, Dist Ahmednagar |
|---|---|---|---|
| निविदा/ दर रुपये प्रति मे.टन | १८,९९०/- | १९,७५०/- | २०,६००/- |

उपरोक्त प्रमाणे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता निविदाधारक विक्रम केमिकल्स,नाशिक यांचे दर रक्कम रु.१८,९९०/- प्रति मे.टन सर्वात कमीचे प्राप्त झाले आहे.

तसेच विक्रम केमिकल्स, नाशिक यांचे प्राप्त दर निविदा समिती यांना जादाचे वाट असल्याने निविदाधारक यांना वाटाघाटी करीता पत्रान्वये कळविले असता विक्रम केमिकल्स,नाशिक यांनी दि.१७/०३/२०२५ च्या पत्रान्वये तुरटी बनवण्यासाठी लागणारा सल्फुरीक ॲसीड हे मुख्य घटक असून त्याचे दर हे मागील वर्षात रु.४,०००/- प्रति टन होते व आज दर १०,७००/- प्रति टन आहे. तरी सदर दरवाढ ही दुप्पटपेक्षा जास्त झाली असुन त्यानुसार निविदेत दर भरलेले आहेत. तसेच दि.१९/०३/२०२५ च्या पत्रान्वये सदर प्राप्त दरात रु.३६०/- प्रति मे.टन दर कमी करुन रक्कम रु.१८,६३०/- मात्रच्या दरात पुरवठा करणेस तयारी दर्शवली आहे.

तरी, विक्रम केमिकल्स,नाशिक यांचे वाटाघाटी अंती प्राप्त दर रक्कम रु.१८,६३०/- मात्र निश्चित करणेस तसेच विभागा मार्फत येणाऱ्या मागणी नुसार वेळोवेळी मागणी पत्र निर्गमित करणेस व येणाऱ्या अंदाजे खर्च रक्कम रु.१४० लक्ष मात्र तुरटी या लेखाशिर्षातुन करणेस मान्यता मिळण्यासाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र. ४७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र.:- २५७** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव सार्व.बांधकाम विभाग/१०४/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५

३. निविदा समितीचा निर्णय.

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत सार्व.बांधकाम विभाग अंतर्गत एकुण ०८ ट्रॅक्टरवर प्रत्येकी ०४ मजुर प्रमाणे एकुण ३२ व रस्ता दुरुस्ती पथका अंतर्गत ०३ ट्रॅक्टरवर प्रत्येकी ०३ मजुर प्रमाणे ०९ असे एकुण ४१ मजुर मक्तेदारा मार्फत पुरवठा करणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत मनपा निधी अंतर्गत सार्व बांधकाम विभागा अंतर्गत एकुण ०८ ट्रॅक्टरवर प्रत्येकी ०४ मजुर प्रमाणे एकुण ३२ व रस्ता दुरुस्ती पथका अंतर्गत ०३ ट्रॅक्टरवर प्रत्येकी ०३ मजुर प्रमाणे ०९ असे एकुण ४१ मजुर मक्तेदारा मार्फत पुरवठा करणे. कामास अतिरिक्त आयुक्त यांची दि. १८/०२/२०२५ अन्वये च्या मान्यते अन्वये जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिली त्यानुसार सदर कामाची जाहीर ई-निविदा सुचना क्र.५८६ सा.बा./जा.क्र./१९७७ दि.२०/०२/२०२५ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमान पत्रात दि. २१/०२/२०२५ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाद्वारे निविदा भरणेकरीता दि. २०/०२/२०२५ ते दि. २७/०२/२०२५ पर्यत मुदत देण्यात आली होती. मुदतीत संगणकाद्वारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी कागदपत्र क्र. ०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी लिपीक संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन निविदा अ.क्र.०४ चे मक्तेदार ओम साई असोसिएट यांना (१) वर्क इन हॅन्ड बाबतची कागदपत्रे सादर करणे बाबत दि. ०६/०३/२०२५ शॉट फॉल देण्यात आला त्या नुसार त्यांनी दि. ०८/०३/२०२५ रोजी पर्यत कागदपत्र सादर केलेली नसल्याने ते अपात्र ठरत आहे. परंतु (१)शासन निर्णय CAT/२०१७ प्र.क्र.०८/इ.मा.०२/मंत्रालय , मुंबई दि. २७/०९/२०१८ व (२) शासन निर्णय CAT २०१७ /प्र.क्र.८/इमा-२ दि. २०/०५/२०१९ चे शासन निर्णया नुसार (३) शासन निर्णय संकीर्ण २०२१/प्र.क्र.९८/ नवि-१६ दिनांक ०८ जुलै २०२१ अन्वये प्राप्त झालेल्या निविदा स्विकारण्यास निविदा समितीने मान्यता दिल्या नुसार तीन निविदाधारक पात्र असल्याने दोन निविदाधारक यांचे निविदा दराबाबतचे पाकीट क्र. ०२ उघडले असता त्यात आलेल्या दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| ४१ मजुरांसाठी ६४४.४६/- प्रति मजुर त्यावर सर्व्हिस चार्ज प्रमाणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | सर्व्हिस चार्ज (प्रति दिन प्रति मजुर) | सर्व्हिस चार्ज (प्रति दिन प्रति मजुर) + मंजुर दर ६४४.४६ | प्रति दिवस ४१ मजुर | एकुण रक्कम रु ३० दिवसा करीता<br>४१ मजुर | एकुण १२ महिन्या करीता |
| १ | रॅपिड सिक्युरिटी अ‍ॅण्ड लेबर सर्व्हिस | १ रुपये | ६४५.४६ | २६४६३.८६ | ७,९३,९२०/- | ९५२७०४०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | एस.के. कंन्स्ट्रक्शन | ६.४५० | ६५०.९१ | २६६८७.३१ | ८,००,६१०/- | ९६०७३२०/- |
| ३ | शिवा सिक्युरिटी अॅन्ड लेबर सर्व्हिसेस | ६४४.४६० | १२८८.९२ | ५२८४५.७२ | १५,८५,३८०/- | १९०२४५६०/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी अॅण्ड लेबर सर्व्हिस, जळगांव यांचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु ९५२६९८०/- मात्र एका वर्षा करीता इतका खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहेत.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ९५२७०४०/- |
|---|---|---|
| १ | जि.एस.टी.१८% | १७,१४,८६७/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | १,१२,४१,९०७/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एका वर्षा करीता एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.- १,१२,४१,९०७/- मात्र सदर रक्कमेकरीता मनपा अर्थ संकल्प २०२५-२६ चे रस्ते व्यवस्था व दुरुस्ती या लेखशिर्षका खाली मंजुर झाले असल्याने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी अॅण्ड लेबर सर्व्हिस, जळगांव यांची प्राप्त निविदेतील दर सर्वात कमी असुन त्यांची निविदा स्विकारुन कार्यादेश देणेस व प्राप्त दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र. ४७** **(स्थायी समिती)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र.:- २५८** **दिनांक :-३०/०४/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल प्रस्ताव सार्व.बांधकाम विभाग/१०३/२०२५-२६ दि.२९/०४/२०२५
३. उपलेखापाल यांचा दि.२३/०४/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.२३/०४/२०२५ चा अभिप्राय
५. निविदा समितीचा दि.२४/०४/२०२५ चा निर्णय.

**विषय :-** राष्ट्रीय शुध्द हवा उपक्रमातर्गत प्रभाग क्र.०६ दत्त कॉलनी श्री.मोहन वाणी यांचे घरापासुन ते रिंगरोडकडेस जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा १७.३००% कमीचे दर आल्याने सदर दरास व एकुण रक्कम रु.२४,८६,२७४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत राष्ट्रीय शुध्द हवा उपक्रमातर्गत प्रभाग क्र. ०६ दत्त कॉलनी श्री. मोहन वाणी यांचे घरापासुन ते रिंगरोड कडेस जाणाऱ्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. कामास आयुक्त यांचे दि. १९/०३/२०२५ च्या मान्यते अन्वये जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता दिली त्यानुसार सदर कामाची जाहीर ई-निविदा सुचना क्र ५९२ सा.बा./जा.क्र./२१२२ दि.२०/०३/२०२५ चे पत्रान्वये दै.नवभारत या वर्तमान पत्रात प्रसिध्द केल्यानुसार संगणकाद्वारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०६ ई-निविदा मनपा संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. २४,९०,६३९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री अजिंक्य सुनिल पाटील | निविदा रक्कमेवर १७.३००% कमीचे दर | **२०,५९,७५८/-** |
| २ | श्री. नचिकेत सुभाष सोनवणे | निविदा रक्कमेवर १५.२२०% कमीचे दर | **२१,११,५६३/-** |
| ३ | एकविरा इंन्फ्रा, जळगांव | निविदा रक्कमेवर ७.७७७% कमीचे दर | **२२,९६,९४२/-** |
| ४ | श्री. सुरजराजे विजय नारखेडे | निविदा रक्कमेवर १२.६९०% कमीचे दर | **२१,७४,५७६/-** |
| ५ | श्री. विवेक प्रभाकर खर्चे | निविदा रक्कमेवर ४.००% कमीचे दर | **२३,९१,०१३/-** |
| ६ | श्री. हार्दिक प्रकाश पटेल | निविदा रक्कमेवर ७.५००% कमीचे दर | **२३,०३,८४१/-** |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री. अजिंक्य सुनिल पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १७.३००% कमीचे दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु २०,५९,७५८/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहेत.

| अ.नं. | निविदा रक्कमेवर १७.३००% कमी दरा प्रमाणे येणारा अपेक्षीत खर्च रक्कम | २०,५९,७५८/- |
|---|---|---|
| १ | टेस्टींग चार्जेस | १५,१३५/- |
| २ | रॉयल्टी | ३०३२६/- |
| ३ | जि.एस.टी.१८% | ३,७०,७५६/- |
| ४ | कामगार विमा ०.५% | १०२९९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | २४,८६,२७४/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु २४,८६,२७४/- मात्र आहे. मात्र सदरचा खर्च राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रम या लेखशिर्षका खाली मंजुर झाले असल्याने सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार श्री. अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेवर १७.३००% कमीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**